राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
जा.क्र.रा.ग्रा.स्व.अ./प्रशि./२२१ /२०१८-१९
दि. ३१ ऑक्टोबर, २०१८

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, (सर्व)**

**विषय - सन २०१९-२० या वर्षाचा "ग्राम पंचायत विकास आराखडा" अंतीम करणेबाबत...**

**संदर्भ** - १) ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. जीपीडीपी-२०१८/प्र.क्र.५१/पंरा-६, दि. ०६/०९/२०१८

२) ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. जीपीडीपी-२०१८/प्र.क्र.५१/पंरा-६, दि. ०७/०९/२०१८

३) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.रा.ग्रा.स्व.अ./प्रशि./२१०/२०१७-१८, २४ ऑक्टोबर, २०१८

४) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.रा.ग्रा.स्व.अ./प्रशि./२१४/२०१७-१८, २६ ऑक्टोबर, २०१८

ग्रामपंचायत विकास आराखडा व सबकी योजना सबका विकास मोहीमेबाबतची वरील संदर्भिय पत्रे पहावीत. त्यानुसार दि. १३ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत "सबकी योजना सबका विकास" माहीमे अंतर्गत मिशन अंत्योदय सर्वेक्षण पूर्ण करून ते ग्रामसभेमार्फत प्रमाणित करून घेण्याची कार्यवाही पूर्ण करून त्यानंतर सबकी योजना सबका विकास मोहीमेअंतर्गत लोक सहभागातून ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करणेसाठी दिनांक १५ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत विशेष ग्रामसभांचे आयोजन करून प्रत्येक उपक्रमाची माहिती / फोटो http://gpdp.nic.in या वेबसाईटवर अपलोड करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर http://gpdp.nic.in या वेबसाईटवर अपलोड केलेली माहिती / फोटो विचारात घेता जिल्हा निहाय सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे स्थिती दिसून येत आहे. याबाबत केंद्र शासन स्तरावरून बेवसाईटवरील माहितीच्या आधारे नियमितपणे आढावा घेतला जात असल्याने आपण आपल्या स्तरावर आपल्या जिल्ह्याच्या कामकाजाचा आढावा घेवून बाबनिहाय माहिती अपलोड करून ती नियमितपणे अद्ययावत करणेबाबत संबंधीतांना सूचना द्याव्यात.

या वेबसाईटवर नोडल अधिकारी नियुक्ती, फॅसिलिटेटर नियुक्ती, मिशन अंत्योदय Data Captured, शासकीय विभागांचे नोडल अधिकारी नियुक्ती, फ्रंटलाईन वर्कर नियुक्ती, विशेष ग्रामसभा वेळापत्रक, घेतलेल्या विशेष ग्रामसभा, ग्रामसभेचे फोटो, विहित नमुन्यातील माहिती फलक, ग्रामसभेत मंजूर GPDP आराखडे, Plan Plus मध्ये GPDP अपलोड करणे, फॅसिलिटेटर Feedback रिपोर्ट या बाबी अपलोड करावयाच्या आहेत. सोबतच्या तक्त्यावरून ब-याचशा जिल्ह्यांनी ग्रामसभांचे वेळापत्रक, ग्रामसभेचे फोटो, माहिती फलक, फ्रंटलाईन वर्कर नियुक्ती यांची माहिती अद्यापी अपलोड केली नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे काही जिल्ह्यांनी अपलोड केलेले माहिती फलक पाहिले असता, सदरचे फलक विहित नमुन्यात व या मोहीमेशी संबंधीत नसल्याचे दिसून

Scanned by CamScanner

येते. तरी याबाबत आपण विशेष लक्ष देवून या सर्व बाबींची माहिती व फोटो तातडीने अपलोड करून वेबसाईटवर दररोज अद्ययावत करणेबाबत संबंधीतांना सक्त सूचना द्याव्यात.

सोबत - दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजीचा स्थितीदर्शक तक्ता

**राज्य प्रकल्प संचालक**
राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,
रा.गां.प.स.अ./रा.ग्रा.स्व.अ.
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत

१) मा. सचिव, (ग्राम विकास व पंचायतराज), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१ यांना माहितीस्तव सादर
२) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग), यांना कार्यवाहीस्तव सादर

Scanned by CamScanner